An Enlightened Woman

# संस्कृता

SNDT WOMEN'S UNIVERSITY
Estb:1916

Volume 1 | Issue 10 | December 2022

## SANSKRITA - DIALOGUE 7

### HIGHER ORDER THINKING

Learning is a psychological change. When learning happens, a person changes from within and this change is permanent. Learning is a process that leads to a change within a person and which occurs as a result of experience and increases the potential for improved performance and then it leads to further learning. This is just the very broad definition of learning but when learning happens it is an experience in itself. While experiencing all senses are involved in it. experience depends on perceptions, and perception on emotions, emotions lead to feeling and together we have a package of experience. These five senses which get involved in lending that experience are neglected in our entire education process. We do not give any importance to training these five senses in our formal contemporary education system.

We actually assume that these five senses are trained automatically. Sense of seeing, sense of hearing taste , touch , and the sense of smell. These senses actually transform physical experience into emotional one. These sense organs have tremendous potential for enhancing or degrading the experience. Learning experience can be facilitated by training these sense organs. We focus normally on external ways of learning and we assume that the information given is automatically converted into learning but the percentage of information which gets converted into knowledge and then into wisdom and then into learning is very less.

Bhartiya way of learning has not only given importance to five senses but has also added three more senses i.e. Mana, Buddhi and Ahankara; together they work on the holistic development of the learner. Information is processed inside. The inner software will decide how to analyse it and what sense to be made from it. Therefore, learning is always individualistic. Every learner is unique and has an exclusive way of learning.



National Education Policy 2020 has therefore focused on this issue and tried to deal with it by providing freedom of designing pedagogical strategies to every teacher. Are we aware of this? Can we work on the pedagogy of our own subject by involving five senses of our learners/students?

Prof. Ujwala Chakradeo
Vice Chancellor
S.N.D.T. Women's University

## संपादकीय

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ हे स्त्री शिक्षणाचे कार्य करणारे भारतातील एक महत्त्वपूर्ण केंद्र आहे. स्त्रियांचे बौद्धिक दृष्ट्या सक्षमीकरण येथून घडते. जीवनातील विविध क्षेत्रात त्यांना अग्रेसर होण्यासाठी इथून ऊर्जा प्राप्त होते. महर्षी कर्वे यांनी शंभर वर्षांपूर्वी लहानसे रोपटे लावले. त्याचा आता वटवृक्ष झाला आहे. पाच विद्यार्थिनींना घेऊन केलेली सुरवात आता हजारो विद्यार्थिनी इथून शिक्षण घेताहेत. त्या काळी पै पै गोळा करून सुरुवात केली. अनेक समस्या होत्या. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी तेव्हा कमी होत्या. आज विद्यापीठाचा विस्तार झालाय. शासनाची मान्यता आहे. प्रथम तीन आणि आता तर चार ते पाच कॅंपसमधून विद्यापीठ विस्तारत आहे. हे विद्यापीठ भारतीयांसाठीच नव्हे तर जगभरातील लोकांसाठी आदर्शभूत ठरावे इतके याचे वलय दिव्यत्वाने तेजाळत आहे. गौरवशाली परंपरा आणि स्वत्व याचे सौंदर्यपूर्ण प्रारुप म्हणजे हे विद्यापीठ आहे.

विद्यापीठाचा कणा असतो तो तेथील अभ्यासू प्राध्यापक वर्ग. त्यांच्या ज्ञानावर खऱ्या अर्थाने विद्यापीठाची इमारत उभी असते आणि ज्ञानाचे क्षेत्र हे अफाट आहे. ते संकुचित वा मर्यादित करून चालत नाही. प्राध्यापक जितके ज्ञानी असतील तितकी त्यांची ज्ञानदानाची क्षमताही अधिक असते. म्हणूनच कोणत्याही विद्यापीठात प्राध्यापक हा घटक सर्वाधिक महत्त्वाचा असतो. विद्यापीठाची ओळख तिथल्या प्राध्यापकांमुळे असते. अमुक ठिकाणी उच्च शिक्षण का घ्यायचे तर तेथील प्राध्यापक किती उच्च विद्याविभूषित आहेत; किती व्यासंगी आहेत; त्यांचे संशोधन किती झाले आहे या सर्व बाबी विचारात घेतल्या जातात. विद्यापीठांमधून उच्चतर पातळीचे संशोधन होणे अपेक्षित आहे. अध्यापनाच्या तांत्रिक चौकटी विस्तारून संशोधनासाठी प्राध्यापकांनी सज्ज झाले पाहिजे. यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फार मौलिक विचार आहेत. 'प्रोफेसरांचे संशोधनकार्य' या विषयावर बोलताना ते म्हणाले होते, " प्रोफेसरांनी अध्ययनाच्या आणि अध्यापनाच्या कामी स्वतःला वाहून घ्यावे. प्रोफेसर लोकांनी भलती कामे अंगावर घेऊन आपल्या जबाबदाऱ्यांचे क्षेत्र उगाच वाढवीत जावे ही गोष्ट मला मान्य नाही. अध्यापन व अध्ययन यामध्ये संशोधनही आलेच. या तीन गोष्टींखेरीज प्रोफेसरांनी दुसरे कोणतेही काम करता कामा नये." हा अत्यंत दूरदृष्टीचा विचार त्यांनी त्या वेळी मांडला. तो आजही तसाच लागू पडतो. शिक्षक-प्राध्यापक वेगवेगळ्या कामांमध्ये गुंतून पडले तर त्यांचे जे मूळ कार्य आहे त्याकडे त्यांना लक्ष केंद्रित करता येणार नाही.

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठातील प्राध्यापक वर्ग निश्चितपणे संशोधनाच्या दिशेने अग्रेसर आहे. 'संस्कृता स्त्री पराशक्ती' हे ब्रीद असल्यामुळे सबलीकरण, सशक्तीकरण हा ध्यास आहे. विद्यापीठ पातळीवरील संशोधनात प्राध्यापक मंडळी रस घेतातच. पण, विद्यापीठाच्या बाहेरही येथील मंडळी नावारूपाला आलेली आहेत. समाजातील इतर क्षेत्रातही त्यांचा संचार वाढतो आहे. सामाजिक बांधिलकी त्यांनी जोपासली आहे. शिक्षण हे केवळ विद्यापीठातील वर्गखोल्यांपुरते मर्यादित न राहता समाजातील अलक्षित घटकांकडे हस्तांतरित व्हायला हवे हा उदात्त हेतू त्यामागे आहे. त्यासाठी विविध क्षेत्रात भेटी देऊन ज्ञानदानाचे कार्य केले जात आहे.

असे असले तरी संशोधन आणि अध्ययन यात खंड न पडू देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. जगात संशोधनाचे मोल वाढले आहे. विविध क्षेत्रातील नव्या संशोधनामुळेच मानवजातीची प्रगती होत आहे. त्यातही एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठात स्त्री शिक्षणाची जिथे जाज्वल्य परंपरा आहे; तेथे ज्ञानाला नव्या दृष्टीने बघणे आवश्यक आहे. स्त्री शिक्षणाचे महत्त्व वाढले पाहिजे यासाठी जुनाच दृष्टिकोन बाळगण्यात काहीच अर्थ नाही. प्रगतीची नवनवीन शिखरे आपल्याला खुणावत आहेत. स्त्री शिकली तर ती प्रगतीच्या दिशेने झेप घेईल. तिच्या पंखांना बळ देण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी विद्यापीठातील अध्ययन व अध्यापनाच्या कक्षा विस्तारण्याची आवश्यकता आहे. संशोधन अधिक वाढविण्याची आवश्यकता आहे आणि हे प्राध्यापकच करू शकतात. काळ कोणताही असो तो नव्या अभ्यासक, संशोधकांना खुणावत असतो. त्यामुळे त्याकडे निराशेने नव्हे तर खूप आशेने बघितले पाहिजे. त्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन बाळगण्याची आवश्यकता आहे. अध्यापन आणि अध्ययन हे संशोधनकेंद्री होण्याची आवश्यकता आहे. त्यातूनच विकासाच्या नव्या दिशा पल्लवित होण्याची दाट शक्यता आहे.

टीम संस्कृता

## This Month....

December is the coldest month of the year in temperature and hottest in activities. With exam on the one hand, students and teachers are involved in many cultural activities like Annual day, Seminars, Conference of different department/colleges of the university.

Constitution day was observed on 26th November, 2022 by taking oath. This was organized by Dr. Babasaheb Ambedkar Chair and PVDT College of Education. An International conference on "Bhartiya Women A True Perspective" was organized by Doon University in collaboration with SNDT Women's University and Samvardhinee Nyas. This conference brought out true face of Bhartiya Women in current perspective.

One of the most important attributes of women is compassion. This attribute is very well used in Special Education Department of university which gives teachers training to women students in teaching special children. This department is one of the first of its kind in any university. Recently an international conference on "Holding Spaces Across Communities using Dance & other Arts Therapies" was organized by this department which is an Annual event.

Amidst such academically motivating and culturally vibrating events university Senate election was one of the very important events which kept the contestants, voters, the organizers and the observers on their toes. This was as full of enthusiasm as any general election.



University is expanding its campuses and 5th campus of the SNDT WU is likely to be opened soon in Chandrapur. This will take care of the women in relatively less developed & marginalized areas. Preparation of detailed project report for Chandrapur is another matter which kept us involved in it. We were full of new ideas about courses, teaching learning pedagogy, layout of the campus and other details. Looking forward to visit the Chandrapur campus in near future.

Prof. Ruby Ojha
Pro - Vice Chancellor
S.N.D.T. Women's University

## EDITORIAL BOARD MEMBERS

- Dr. Subhash Chavan
- Dr. Sujata Gokhale
- Dr. Nancy Fernandes
- Dr. Sunil Ramteke
- Dr. Prabhakar Chavan
- Dr. Manisha Madhwa
- Dr. Rekha Chavan
- Dr. Pallavi Prakash
- Dr. Dharmaji Kharat
- Dr. Kavit Pandya
- Dr. Sanjay Kumar Phad
- Mr. Ameya Mahajan

TECHNICAL ASSISTANT :

- Dr. Nitin Prabhutendolkar
- Dr. Balu Rathod
- Mr. Mehul Khale

## पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाचे विद्यापीठात आयोजन

डिसेंबर १ रोजी एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग तसेच समाजकार्य विभागाच्या वतीने पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. आझाद मैदान पोलीस स्टेशनचे मा.पोलीस निरीक्षक, श्री.सुरेश माने यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग नोंदविला.





## मा. हीरालाल चौधरी वन परिक्षेत्र अधिकारी इगतपुरी यांचे मुलाखत.

दिनांक 28 नोव्हेंबर 2022

आमच्या विद्यापिठाचे प्रभारी माननीय प्रोफेसर डॉक्टर प्रभाकर चव्हाण सर आणि प्रोफेसर अमेय महाजन महाजन यांच्या सहकार्याने हा उपक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात एम एस डब्यु च्या विदयार्थिनी उपस्थित होत्या.

हिरालाल चौधरी सर यांचे मुलाखत घेण्यात आले त्यांचे मुलाखत दद्वितीय वर्षाची विद्यार्थिनी दिव्या हीने घेतला. मुलाखतीत विचारलेला सर्वात पहिला प्रश्न हा होता की हिरालाल चौधरी सर यांचे बाालपण कसे गेले ?

हिरालाल चौधरी सर यांचे बाल पण चाळीस गाव येथे गेले आहे. त्यांचे बाल पण अतिशय गरीबी मध्ये गेले आहे. त्यांनी गरीबीतुन मात करून कशा प्रकारे ते इथं पर्यंत पोहचले त्यांचा पुर्ण प्रवास त्यांनी आम्हाला सांगितला.

सरांचे शिक्षण आयटी इंनिजिनियरींग झाले होते आणि त्यांचे एमबीए सुध्दा पुर्ण झाले होतें. सर आयटी कंपनी मध्ये 2 वर्ष काम केले होते. काम सोडुन सरांनी UPSC ची तर्यारी सुंरू केली. 2 वर्षं सरांनी अभ्यास केला. आणि पहित्या परिक्षेतच ते पास झाले.

सरांचे लहान पणा पासून स्वण होते की सरकारी नौकरीच करायची. त्यांनी NET ची परिक्षा दिली आणि संपुर्ण भारतामधून हिरालाल चौधरी सरांचा 16 नंबर आला होता. त्यांना भरपुर कंपनी मधुन कामाची संधी आलेली पण सरांनी वन परिक्षेत्र हे क्षेत्र निवडले त्यांच लहान पणा पासून स्वप्न होत ते स्वप्न त्यांनी पुर्ण केल.

सरांच पहिल पोस्टिंग मेळघाट या गावामध्ये झाल हात. त्या गावात कसलीच सोय न्हवती. मोबाइल मध्ये नेटवर्क सुदधा न्हवते. पिण्याचे पाणी सुध्दा स्वच्छ न्हवते.

अशा ठिकाणी त्यांनी काम केले त्या गावामध्ये भरपुर सोयी उपलब्ध करून दित्या त्या कामामध्ये त्यांना मदत करणारे काही एम एस डब्यू चे कार्यकर्ते सुध्दा होते. आम्हा विदयार्थ्यांना पडलेत्या प्रश्नांचे उत्तर सुध्दा त्यांनी दिले. अशा प्रकारे हिरालाल चौधरी सर यांचे मुलाखत पुर्ण झाले अशा प्रकारे कार्यक्रम संपन्न झाला.



## जनार्दनस्वामी योगाभ्यासी मंडळ, नागपूर व एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई द्वारा प्रमाणित 'योग परिचय' प ्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा नागपूर येथे शुभारंभ संपन्न

नागपूर - पूज्यपाद गुरुमूर्ती प.पू. जनार्दनस्वामी महाराज यांनी नि:शुल्क योगप्रचारासाठी समाजात नि:स्वार्थी व निष्ठावान योगशिक्षक तयार व्हावेत यासाठी १९५५ या वर्षीपासून योगप्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु केला होता.आजही तो सुरू आहेच. आता यास एसएनडीटी महिला विद्यापीठाची सोबत मिळाली असल्यामुळे आणखी महत्व येईल.

आजच्या काळात योग आवश्यक आहेच सोबतच त्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाले तर आणखी अनेकांना याचा फायदा होईल. कोविड काळात अनेकांना योगाचे महत्त्व कळाले सोबतच आपल्या व्यक्तित्वाला सक्षम करणे, सामर्थ्य देणे यासाठी योग परिचय अभ्यासक्रम महत्त्वाचा ठरणार आहे असे प्रतिपादन एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांनी केले.

योग परिचय प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा शुभारंभ कार्यक्रमाचे आयोजन नागपूर येथील जनार्दनस्वामी योगाभ्यासी मंडळाच्या केंद्रात रविवार (दिनांक १३ नोव्हेंबर) रोजी सकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आला होता यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनार्दनस्वामी योगाभ्यासी मंडळ,नागपूरचे योगगुरू श्री.रामभाऊ खांडवे गुरुजी उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे प्रभारी संचालक डॉ.प्रभाकर चव्हाण, योगाभ्यासी मंडळाचे कार्यवाह मिलिंद वझलवर, योगाभ्यासी मंडळाचे परीक्षा नियंत्रक वसंत नानेकर तथा प्रमुख अतिथी म्हणून पद्माकर जोशी उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन श्री.रामभाऊ खांडवे गुरुजींनी केले, समाजाला सुशिक्षित, सुरक्षित व निरोगी बनविण्याचे माध्यम म्हणजे योग व त्यामुळे योगाला सर्वदूर पोहोचविण्यासाठी योग परिचय प्रमाणपत्र अभ्यासक्रम आवश्यक असल्याचे सांगत या प्रमाणपत्र कोर्ससाठी एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबईनी पुढाकार घेतला असून यामुळे अनेकांनी याचा फायदा घ्यावा असे सांगत त्यांनी विद्यापीठाचे कौतुक केले.

आता जनार्दनस्वामी योगाभ्यासी मंडळाच्या योग परिचय प्रमाणपत्र अभ्यासक्रमाला एसएनडीटी महिला विद्यापीठाची मान्यता असणार आहे. एसएनडीटी महिला विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण देशभर असल्यामुळे या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाला निश्चितच सर्वदूर पोहोचविण्यासाठी दिशा मिळणार आहे. हा अभ्यासक्रम प्रत्यक्ष व आभासी पद्धतीने शिकण्याची व्यवस्था मंडळाने उपलब्ध करून दिली आहे. अनेक विद्यापीठांमध्ये योगाभ्यासी मंडळाची परीक्षा व अभ्यासक्रम हा आदर्श मानला जातो. सर्वांनी या अभ्यासक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे. कार्यक्रमाचे संचालन योगाभ्यासी मंडळाचे कार्यवाह मिलिंद वझलवर यांनी केले. यावेळी योगाभ्यासी मंडळाचे अनेक साधकांची उपस्थिती होती.



## बल्लारपूर क्रीडा संकुलानजीक उभे राहणार एसएनडीटी महिला विद्यापीठाचे केंद्र

### पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत जागेची निवड अंतिम

**२० नोवेंबर रोजी चंद्रपूर जिल्ह्यात पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नामुळे मंजूरी मिळालेल्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या (एसएनडीटी) केंद्रासाठी बल्लारपूर क्रीडा संकुलानजिक विद्युत विभागाच्या जागेची निवड करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या केंद्रासाठी नवीन इमारत बांधकाम सुरू करण्यासाठी ५० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. त्यात नकाशा मंजूरी व इतर प्राथमिक कामे तातडीने करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.**

बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथे विद्यापीठासाठी 50 एकर जागेची पाहणी करतांना ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., बल्लारपूरच्या उपविभागीय अधिकारी डॉ. दिप्ती सुर्यवंशी, अधिक्षक अभियंता (महावितरण) संध्या चिवंडे, अधिक्षक अभियंता श्री. अवघड




(महापारेषण), न.प. मुख्याधिकारी विशाल वाघ, विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, सहाय्यक कुलसचिव डॉ. बाळू राठोड, आर्किटेक्ट आनंद भगत, भुमी अभिलेख विभागाचे अधिक्षक प्रमोद घाडगे आदी उपस्थित होते.

महिलांना शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी एसएनडीटी विद्यापीठाचा वाटा मोठा आहे, असे सांगून पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, वेगवेगळे शैक्षणिक, रोजगारभिमुख आणि कौशल्यआधारीत अभ्यासक्रमांना आजही मागणी आहे. याच उद्देशाने चंद्रपूर आणि परिसरातील विद्यार्थीनीना आवश्यक असणारे साधारण 10 अभ्यासक्रम या विद्यापीठातून शिकविण्यात येतील.

सार्वजनिक बांधकाम विभागाने विद्यापीठाचे बांधकाम नाविण्यपूर्ण पद्धतीने करावे. विद्यार्थीनींसाठी संपूर्ण अद्ययावत सोयीसुविधा तेथे उपलब्ध कराव्यात. विद्यापीठ केंद्राच्या इमारतीचे बांधकाम एका वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन करा, अशा सुचनाही पालकमंत्र्यांनी यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिल्या.

सदर बांधकाम पूर्ण होईपर्यंत एस.एन.डी.टी विद्यापीठाचे पुढील शैक्षणिक सत्राचे अभ्यासक्रम बल्लारपूर नगर परिषदेने नव्याने बांधलेल्या नेताजी सुभाषचंद्र बोस मुलींची डीजीटल शाळा येथे सुरू करण्यात येणार आहे. या शाळेची देखील पालकमंत्र्यांनी पाहणी केली. येथे शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच विद्यार्थीनींसाठी जवळच वस्तीगृहाची सोय करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी नायब तहसीलदार श्री. साळवे, सा.बा. विभागाचे श्री. मुत्यलवार यांच्यासह चंदनसिंग चंदेल, आशिष देवतळे, हरीष शर्मा, काशीसिंग, मनिष पांडे, नीलेश खरबडे आदी उपस्थित होते.

## Green Fashion India A Prelude 2022

9th International Conference of Green fashion India- A Prelude, an initiative of MKSSS's School of fashion technology powered by SNDT Women's University, Mumbai was organized on 1st and 2nd December 2022.

Green Fashion India (GFI) has been a premier platform over the years for exchange of ideas, information, and sustainable practices to promote enriched sustainable living.

You Must Be The "change"; You Wish To See In The World!

**- Mahatma Gandhi.**



Theme for GFI, Prelude – Advocating "Social Sustainability" through Perspective and Practices to enhance Lifestyle quotient.

**Objective of the Prelude**

To advocate Social Sustainability through Perspective and Practices in the Fraternity and to further enhance Lifestyle quotient.

GFI Prelude 2022 Conference witnessed an exciting mix of stalwarts from the industries, academia and students. The discussions centered around increasing ecological awareness in textile and fashion industry and to take it beyond the regular responsible approach of individuals to the wider perspective- the "society".

Under the main theme there were 10 sub themes. Each sub theme had a dedicated group of mentors, supporting ideators from the industry, academia as well as students & faculty co-coordinators. The Subthemes of the conference revolved around following perspectives to plan for actionable solutions

- Social Sustainability through Design
- Social Sustainability through Diversity in Products and Processes
- Social Sustainability through Communities
- Social Sustainability through Cohesion (Collaborations and Co- Creations)
- Social Sustainability through Technology
- Social Sustainability through Business Models
- Social Sustainability through Equity
- Social Sustainability Reach & Promotion
- Social Sustainability through Sustainable Education
- Social Sustainability through Thinkers to attain Social Sustainability






**Inauguration and Feliciations-**

Event was graced and addressed by the following dignitaries

**PRESIDENT OF THE CEREMONY:** Dr. Vinay Sahastrabudhhe. President, Indian Council for Cultural Relations.
The idea of 'Sustainability' is not new for India and Indian culture. The focus of Indian culture and Indian spiritual philosophy is based on ' being grateful to mother nature'. So it is very natural, that when it comes to fashion, India takes the lead and talks about 'Green Fashion'.

**CHIEF GUEST:** Mr. Rahul Mehta. Ex-President CMAI, IAF Chief Mentor CMAI
We have got to create a platform, an ecosystem whereby sustainability becomes a practice, practice is not going to happen if it is restricted to top 10-15 brands or retailers in India; it has to reach down to common manufacturers, small brands, average players of the Industry to make a real difference.



**GUEST OF HONOUR:** Padmashri Girish Prabhune Socialworker & Socialactivist, Founder and President of Punarutthan
India is rich with art, crafts, skills and most importantly organic processes. If we can incorporate this approach of organic learning of skills and mindset into our education system,it will help sustainability and everyone will be truly knowledgeable"

**SPECIAL ATTENDEE:** VC Ujjwala Chakradeo. Hon.Vice Chancellor, SNDT Women's University, Mumbai.
This conference, this platform of Green Fashion is to bridge the gap -the disassociation between educational institutions, academicians and society. The greenness of fashion comes not only from environment but from culture what we are showcasing here.

**SPECIAL GUEST:** Dr. Rajesh Balakrishnan. CEO, IndustrialProduct Division, Pidilite Industries.
Over last 11 years - standards have gone up, standards have got unified, having sustainable products has become a 'requirement' (as against compliance) to stay in business.



**KEYNOTE SPEAKER:** Dr. Ulhas Nimkar. President SDC-UK & Chairman, at NimkarTek
Sustainable change has to be measurable, quantifiable and each aspect & process has to be optimized to make a positive impact.

**GFI PRESIDENT:** Arch. Mohana Kadam. Mgmt. Committee Member, MKSSS
With the meaningful and wholehearted support and involvement of our dedicated designers, academicians, artisans and industry partners we have formed an oracle to make this forum stronger and make its presence felt in the fashion fraternity globally.
GFI Validictory Session was graced by Dr.Ruby Ojha, Hon.Pro VC of SNDT Women's University, Mumbai in a capacity of Chief Guest along with Mr.Ravindra Deo Chairman MKSSS, in a capacity of Guest of Honor.

Dr.Hundekar Secretary of Green Fashion India announced the Main Conference of GFI scheduled in the month of October 2023.

# श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ अधिसभा (Senate) प्रतिनिधींसाठीच्या निवडणूका-२०२२

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 नुसार कृषीतर आणि वैद्यकेतर विद्यापीठांमध्ये विविध प्राधिकारणाची तरतुद करण्यात आली आहे. कृषीतर आणि वैद्यकेतर विद्यापीठातील विद्याविषयक स्वायत्ता व अत्युच्च गुणवत्ता, लोकशाही प्रक्रियेद्वारे पर्याप्त प्रतिनिधीत्व आणि उच्च शिक्षणाची अभिवृध्दी त्याचे बळकटीकरण आणि विनियमन या अधिनियमाद्वारे प्रदान करण्यात आले आहे. या अधिनियमांचे विद्यापीठ स्तरावरील नियमन करण्यासाठी अधिनियमातील भाग चार अनुच्छेद 26 ते 70 या मध्ये एकूण 18 प्राधिकारणांच्या निर्मीती ची प्रक्रिया, त्यांची कार्ये व रचना, जबाबदाऱ्या आणि कार्य करण्याच्या पध्दतीचा समावेश करण्यात आला आहे. या प्राधिकरणामध्ये प्रामुख्याने अधिसभा (Senate), व्यवस्थापन परिषद (Management Council), विद्या परिषद (Academic Council) आणि विद्या शाखा (Board of Studies) या बरोबरच इतर 14 मंडळांचा समावेश केलेला असून प्रत्येक प्राधिकरणाचा कालावधी हा पाच वर्षांचा असतो. परिणामी प्रत्येक कृषीतर आणि वैद्यकेतर विद्यापीठांमध्ये या प्राधिकारणांची निर्मीती ही अतिशय महत्वाची आणि अवश्यक असते.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 नुसार श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाने 1 सप्टेबर 2022 ते 31 ऑगस्ट 2027 वर्ष 2022 या पाच वर्षासाठी विविध प्राधिकरणावरील प्रतिनिधी निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर केला आहे. त्यानुसार सर्वप्रथम महत्वाच्या मानल्या जाणाऱ्या अधिसभेसाठी (Senate) निवडणूका घेण्यात आल्या. अधिसभेवर निवडणूकीच्या माध्यमातून निवडून दिले जाणारे विद्यापीठातील तीन शिक्षक, विद्यापीठाची संलग्न महाविद्यालये व संस्थांमधून दहा शिक्षक, विद्यापीठातील दहा प्राचार्य, तसेच विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व संस्थातील व्यवस्थापन मंडळाच्या सहा प्रतिनिधींसाठीची निवडणूक दिनांक 28 नोव्हेंबर 2022 रोजी पार पाडली व निकाल दिनांक 29 नोव्हेंबर 2022 रोजी जाहिर करण्यात आले तर अधिसभेवर निवडूल दिल्या जाणाऱ्या 10 नोंदणीकृत पदवीधर प्रतिनिधींसाठीची निवडणूक दिनांक 04 डिसेंबर 2022 रोजी पार पडली असून त्याचे निकाल दिनांक 05 डिसेंबर 2022 रोजी जाहिर करण्यात आले.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 नुसार विद्यापीठ अध्यापक गटातून (Collegium of University Teachers) अधिसभेवर तीन प्रतिनिधी निवडले जातात. विद्यापीठाने नियुक्त केलेल्या विद्यापीठ विभागाचे, विद्यापीठ परिसंस्था आणि संचलित महाविद्यालयांच्या अध्यापकांचा समावेश या गटात होतो. या गटातील मतदार नोंदणीसाठी एकूण 160 अध्यापकांनी अर्ज केले होते व त्यातील 154 अध्यापकांचा अंतिम मतदार यादीत समावेश झाला. जाहीर केलेल्या निवडणूक सुचनेनुसार खुला, इतरमागास आणि महिला प्रवर्गाला प्रत्येकी एक जागा निश्चित केली होती. प्रतिनिधींच्या निवडीसाठी खुल्या प्रवर्गातून 04 उमेदवार, इतरमागास प्रवर्गातून 03 उमेदवारांनी निवडणूक लढविली तर महिला प्रवर्गातून एकच उमेदवारी अर्ज अंतिम झाल्याने त्या उमेदवाराची निवड बिनविरोध जाहिर करण्यात आली.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 नुसार विद्यापीठ अध्यापक गटातून (Collegium of University Teachers) अधिसभेवर निवडून आलेले तीन प्रतिनिधी:


Dr. Ghatvisave Siddharth Kacharu


Shri Koltame Mahesh Hanmanth


Smt. Sonakshi Vichare Udairaj

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 नुसार प्राचार्यांच्या गटातून (Collegium of Principals) अधिसभेवर 10 प्रतिनिधी निवडले जातात. पुर्णकालीन मान्यताप्राप्त प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांचा यात समावेश होतो. या गटातील मतदार नोंदणीसाठी एकूण 12 प्राचार्यांनी अर्ज केले होते व त्यातील सर्वांचा समावेश अंतिम मतदार यादीत झाला. जाहीर केलेल्या निवडणूक सुचनेनुसार खुल्या प्रवर्गास 05 तर अनु. जाती, अनु.जमाती, भटक्या व विमुक्त जमाती आणि इतरमागास प्रवर्गांसाठी प्रत्येकी एक आणि महिला प्रवर्गाला एक जागा निश्चित होती. प्रतिनिधींच्या निवडीसाठी अनु.जाती, अनु. जमाती आणि भटक्या व विमुक्त जमाती या प्रवर्गातून उमेदवारी अर्ज आले नव्हते. खुल्या प्रवर्गातून 05 जागांसाठी 06 उमेदवार रिंगणात होते, मात्र इतरमागास प्रवर्गातून 01 आणि महिला प्रवर्गातून एकच उमेदवारी अर्ज अंतिम झाल्याने त्या उमेदवाराची निवड बिनविरोध जाहिर करण्यात आली.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 नुसार प्राचार्यांच्या गटातून (Collegium of Principals) अधिसभेवर निवडून आलेले प्रतिनिधी:


Dr. Dhake Suresh Bhaskar


Dr. Chandak Sujit Ratanlal


Mr. Patil Amol Ashokkumar


Mr. Uparwat Vinod Vasudeo


Mr. Bansode Sainath Radhesham


Mr. Ghadke Sunil Jagannath


Dr. Pawar Sunil Madhukar


Dr. Jadhav Hukumchand Shankar


Dr. Shinde Raju Kattu


Dr. Mehta Jayashree

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 नुसार अध्यापक गटातून (Collegium of Teachers) अधिसभेवर 10 प्रतिनिधी निवडले जातात. विद्यापीठातील संलग्न व स्वायत्त महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिस्थ्याच्याअध्यापकांचा या गटामध्ये समावेश होतो. या गटातील मतदार नोंदणीसाठी एकूण 234 अध्यापकांनी अर्ज केले होते त्यातील 173 अध्यापकांचा समावेश अंतिम मतदार यादीत झाला. जाहिर केलेल्या निवडणूक सुचनेनुसार खुल्या प्रवर्गास 05 तर अनु. जाती, अनु.जमाती, भटक्या व विमुक्त जमाती आणि इतरमागास या प्रवर्गांसाठी प्रत्येकी एक आणि महिला प्रवर्गाला एक जागा निश्चित होती. प्रतिनिधींच्या निवडीसाठी अनु. जमाती आणि भटक्या व विमुक्त जमाती या प्रवर्गातून उमेदवारी अर्ज आले नव्हते. खुल्या प्रवर्गातून 05 जागांसाठी 08 उमेदवार रिंगणात होते, इतरमागास प्रवर्गातून 03, अनु.जाती 03 आणि भटक्या व विमुक्त जमाती या प्रवर्गातून 02 तर अनु. जमाती आणि महिला प्रवर्गातून एकच उमेदवारी अर्ज अंतिम झाल्याने त्या उमेदवाराची निवड बिनविरोध जाहिर करण्यात आली.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 नुसार अध्यापक गटातून (Collegium of Teachers) अधिसभेवर निवडून आलेले प्रतिनिधी:


Mr. Chaudhari Arun Pandurang


Mr. Patil Aniket Vijay


Mrs. Bogawar Pranjal Sachin


Mrs. Ajmera Smita Atul

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 नुसार व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून (Collegium of Management Representatives) अधिसभेवर 06 प्रतिनिधी निवडले जातात. विद्यापीठातील संलग्न व स्वायत्त महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिस्थ्याच्या व्यवस्थापन समितीतील सदस्यांचा गटामध्ये समावेश होतो. या गटातील मतदार नोंदणीसाठी एकूण 21 अर्ज होते. त्यातील 17 सदस्यांचा समावेश अंतिम मतदार यादीत झाला. जाहिर केलेल्या निवडणूक सुचनेनुसार खुल्या प्रवर्गास 04 तर इतरमागास या प्रवर्गांसाठी आणि महिला प्रवर्गाला प्रत्येकी एक जागा निश्चित होती. प्रतिनिधींच्या निवडीसाठी खुल्या प्रवर्गातून 04 जागांसाठी 03 उमेदवार, इतरमागास प्रवर्गातून 01 आणि महिला प्रवर्गातून एकच उमेदवारी अर्ज अंतिम झाल्याने सर्व उमेदवारांची निवड बिनविरोध जाहिर करण्यात आली.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 नुसार व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून (Collegium of Management Representatives) अधिसभेवर निवडून आलेले प्रतिनिधी:


Dr. Nemade Jayashri Madhusudan



Dr.Tatke Pratima Arun


Dr. Kaul Santosh Rakesh


Dr. Madan Jagmeet Gurminder


Dr. Sharma Deepa Nigvendra



Dr. Gurao Rajendra Govindrao


Dr. Menon Asha Mahesh

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 नुसार नोंदणीकृत पदवीधर गटातून (Collegium of Registered Graduates) अधिसभेवर 10 विद्यार्थी प्रतिनिधी निवडले जातात. या गटातील मतदार नोंदणीसाठी एकूण 77 माजी विद्यार्थीनींनी अर्ज केले होते त्यातील 73 विद्यार्थीनींचा समावेश अंतिम मतदार यादीत झाला. जाहिर केलेल्या निवडणूक सुचनेनुसार खुल्या प्रवर्गास 05 तर अनु. जाती, अनु.जमाती, भटक्या जाती व विमुक्त जमाती आणि इतरमागास या प्रवर्गांसाठी प्रत्येकी एक आणि महिला प्रवर्गाला एक जागा निश्चित होती. प्रतिनिधींच्या निवडीसाठी अनु. जमाती आणि भटक्या जाती व विमुक्त जमाती या प्रवर्गातून उमेदवारी अर्ज आले नव्हते. खुल्या प्रवर्गातून 05 जागांसाठी 07 उमेदवार रिंगणात होते, अनु.जातीच्या एका जागेसाठी 05 उमेदवार तर महिलांसाठी राखीव जागेसाठी 03 उमेदवार निवडणूकीसाठी उभे होते. इतरमागास प्रवर्गातून एकच उमेदवारी अर्ज अंतिम झाल्याने त्या उमेदवाराची निवड बिनविरोध जाहिर करण्यात आली.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 नुसार दणीकृत पदवीधर गटातून (Collegium of Registered Graduates) अधिसभेवर निवडून आलेले प्रतिनिधी:


Ms. Mullani Ruksana Firoz


Ms. More Raavee Rajendra


Ms. Wankhade Archana Ramkrishna Kamal


Ms. Zadbuke Suvarna Jagdish


Ms. Sukhdev Varsha Gorkhnath


Ms. Sonawane Archishmati Ashok Manaswita


Ms. Koli Vidya Suhas


Ms. Manglekar Monika Rahul

निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया ज्यामध्ये मतदार याद्या तयार करण्यापासून ते अंतिम मतदार याद्याची सुचना, उमेदवारी अर्ज भरणे तसेच निवडणूकांचा प्रयक्ष कार्यक्रम आणि निकालाबाबतेची संपर्ण माहिती प्रत्येक उमेदवारांस इमेलद्वारे पाठविण्यात येत होती तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देखिल सर्व माहिती वेळोवेळी अपलोड केली जात होती. निवडणूका एकूण 7 केंद्रांवर पार पडल्या.

## एसएनडीटी महिला विद्यापीठात संविधान दिन साजरा

संविधान दिनानिमित्त एस एन डी महिला विद्यापीठामध्ये विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले व उपस्थित शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थिनींसह संविधानाच्या प्रस्ताविकाचे वाचन केले.

या प्रसंगी मार्गर्शन करताना डॉ. नांदवडेकर यांनी जगातील सर्वातमोठी लोकशाही असणाऱ्या आपल्या देशाच्या प्रगतीचे गमक आपल्या राज्यघटनेत असल्याचे सांगितले व सर्वांनी घटनात्मक मूल्यांचे आपल्या दैनंदिन जीवनात अनुसरण करावे हा संदेश दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. महेश कोलतमे यांनी केले तर डॉ. प्रभुतेंडोलकर यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.








## SELF DEFENSE WORKSHOP ORGANIZED BY SOCIOLOGY DEPARTMENT

The PG Department of Sociology at SNDT Women's University Churchgate organized a self defense workshop by Miss Sakshi Dhaigude on 4th October 2022. Miss Sakshi is a black belt in Karate, gold medalist in Karate, Kick boxing, Thai boxing, Marshall Arts and Judo in state and national levels.

The workshop started by around 12 noon and ended at 2:00 pm. The workshop was started by Dr. Sujata Gokhale, Head of Sociology department welcoming one and all, introducing our guest Miss Sakshi Dhaigude and offering a small gift to our guest on behalf of the Sociology department. The theory part of the self defense workshop was held in classroom no 607 and the practical part was held in the foyer of Patkar Hall building. Both Ma Part 1 and 2 students enthusiastically participated in this self defense workshop.





They were also blackboard decorations done announcing the event. Miss Sakshi taught a lot of easy yet effective and useful self defense tips and tricks to the students which were also practiced by them enthusiastically in the foyer under her guidance. All in all, it was not just a necessary activity in the larger view of things but also a rooting and deeply enriching and exciting experience for all those who were a part of it. The workshop ended with the co-cordinator Miss Ritika Ahuja giving a formal vote of thanks to our guest.

## HISTORY OF DEPARTMENT OF SOCIOLOGY

Department of Sociology which comes under faculty of social sciences is established in 1970 with a vision, to enrich the students with sociological issues and perspectives and to develop their attitude towards sociological research and this percolates through teaching and research among the students which empowers them for making self-conscious decisions.

Department has a great tradition of eminent scholars in the sociology, among them Dr. Neera Desai, Dr. Sudha Gogate, Dr. Sujata Patel worked as the Head of the Department of Sociology since 1960.

Our department has stalwarts personalities as alumnae's who are working on higher posts in various fields, some of them are, our former Hon'ble Vice Chancellor Dr. Vasudha Kamat working with NCERT and now working as an expert member in New Education Policy. Dr. Chaya Datar famous personality in the field of Gender Studies and was working with Tata Institute of Social Sciences, Mumbai. Dr.Maitreyi Krishnaraj was working as an editor of Economic and Political weekly up to 2012.Mrs. Nirmala Samant Prabhawalkar is an Ex -Mayor of Mumbai and now she is working with Women's Commission. Farida Pacchhha , is a famous and Award Winning Short Film and Documentary Maker.

Department offers M.A. and PhD programmes for students since 1970. As we have Research component as a part of syllabus since 2013, M.A. students are doing interdisciplinary research apart from sociology .Internship component is acting as a source of employability and skill development.

Department is multilingual and sociology is taught in Mumbai and across Maharashtra which contributes students strength. Even it is increasing day by day because of increasing employability and skill development due to internship and Research Component. There is diversity observed in the students profile because students are admitting for M. A. programme from Assam, Madhya Pradesh, Uttar Pradesh, Delhi, Manipur, Nagaland and Meghalaya from various states of India.

Department organizes National, state and university level Workshops, Seminars, Conferences as well as field visits, Museum Visits , Debate and discussions, film shows for students. Department of Sociology is student centric, faculties are working for their betterment, enhancing their understanding by giving them theoretical as well as practical knowledge. As a result our current students are working in NGOs, Corporate sectors as HR, research Fellows and Research Assistants, field workers in Research Institutes and they are owing self NGOs also.

## Department of Students' Development organised Health Check-up Camp at University 3 Campuses

Department of Students' Development in collaboration with L.T. College of Nursing, Churchgate Campus organised health checkup camp for students at churchagte campus from October 10-14, 2022. Dr. Vilas Nandavadekar, Registrar, SNDT Women's University inaugurated the health checkup more than 800 students enrolled for health check up.

Health checkup at Juhu campus was held on Oct 17-18, 2022 in collaboration with Nanavati Hospital, Mumbai. The Health Checkup Camp organised at Pune Campus on October 17-18, 2022 in collaboration with SNDT Home Science College, Pune & District Hospital Aundh, Pune.

The Health Checkup consist of Eye checkup,Height, Weight, BMI, Pulse, Respiration and BP, Physicalexamination, CBC testiny, Doctor Consultation.



## International conference on "Bharatiya Women: A True Perspective"

SNDT Women's University collaborated with Samvardhini Nyas, New Delhi and Doon University Dehradun for an International conference on "Bharatiya Women: A True Perspective" at Dehradun during 25-26 November 2022.

The conference was inaugurated by Honorable Governor of Uttrakhand Lt. Gen Gurmit Singhji and Valedictory programme was presided over by Honorable Governor of Maharashtra Shri Bhagat Singh Koshyariji. Professor Surekha Dangwal, Vice Chancellor, Doon University, Professor Ujwala Chakradeo, Vice Chancellor SNDT Women's University, Sushree Madhuri Marathe, Samvarshini Nyas and Leena Gahane, Deputy Advisor NAAC were integral part of the conference. Conference was broadcast live on Doon University Youtube page. Two special sessions, Two Gyan Satras, 49 research papers in seven sessions were presented online as well as offline. Including 12 papers were presented in Gyan and special sessions. Total 61 presentations including one from Denver, US created insights about women of Bharat. SNDT Women's University was represented by Madam Vice Chancellor Prof.Ujwala Chakradeo, Prof. Mira K Desai, Dr. Nalini Patil, Dr. Sheetal More and Prof Meera Shankar. Two papers were presented by SNDT Women's University at the conference- one by Prof Mira K Desai and other by PhD scholar Ms Vipra Banerjee.




## 'શબ્દસાધક શ્રેણી' અંતર્ગત શ્રી જયા મહેતાની કૃતિઓની પ્રસ્તુતિ

૧૧ નવેમ્બર, ૨૦૨૨ શુક્રવારના રોજ મહારાષ્ટ્ર રાજ્ય ગુજરાતી સાહિત્ય અકાદમીના સંયુક્ત ઉપક્રમે એસ.એન.ડી.ટી. મહિલા વિદ્યાપીઠ, મુંબઈ - અનુસ્નાતક ગુજરાતી વિભાગ દ્વારા 'શબ્દસાધક શ્રેણી' અંતર્ગત શ્રી જયા મહેતાની સાહિત્યિક કૃતિઓની પ્રસ્તુતિ કરવામાં આવી હતી. આ શુભ અવસરે ગુજરાતી નાટક અને રંગભૂમિના સમર્થ કલાકાર શ્રી મીનળ પટેલ તથા શ્રી ઉત્કર્ષ મઝુમદાર ઉપસ્થિત રહ્યાં હતા. સાથે અમારા વિભાગનાં કલાકાર બહેનો શ્રી વૈશાલી ત્રિવેદી, શ્રી કીર્તિદા દોશી, શ્રી નીતા કઢી, શ્રી શીતલ ઠાકર તથા શ્રી ગોપી શાહ પણ ઉપસ્થિત રહ્યાં હતાં. આ દરેક કલાકારોએ ગુજરાતી સાહિત્યનાં સુપ્રસિદ્ધ લેખિકા, અનુવાદક અને વિવેચક શ્રી જયા મહેતાની કૃતિઓની ભાવવાહી અને હૃદયસ્પર્શી પ્રસ્તુતિ કરી શ્રોતાઓને રસતરબોળ કરી દીધા હતાં. સાથે અમારા વિભાગની વર્તમાન અને ભૂતપૂર્વ વિદ્યાર્થિની બહેનો દ્વારા તૈયાર કરવામાં આવેલ "સિસૃક્ષા અંક-૩" સામયિકનું વિમોચન પણ કરવામાં આવ્યું હતું. સમગ્ર કાર્યક્રમનું સંચાલન વિદ્યાર્થિની બહેનો દ્વારા સફળ રીતે કરવામાં આવ્યું હતું એનો આનંદ અને પ્રસન્નતા...



## प्रवेश प्रक्रिया ते परीक्षेचे उपक्रम या बाबत उद्बोधन

दिनांक १ नोव्हेंबर २०२२ रोजी परीक्षा व मूल्यमापन मंडळ, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ जुहू आवार सांताक्रुज पश्चिम मुंबई येथे प्रवेश प्रक्रिया ते परीक्षेचे उपक्रम या बाबत उद्बोधन कार्यक्रमाचेआयोजन करण्यात आले हा कार्यक्रम घेण्या करीता कुलगुरु प्रो.उज्वला चक्रदेव यांनी मर्गदर्शन केले त्याच प्रमाणे प्रकुलगुरु प्रो रूबी ओझा व कुलसचिव डॉ विलास नांदवडेकर यानी सहकार्य केले.




शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये विद्यापीठामध्ये नवीन सलग्नित झालेल्या महाविद्यालयातील संचालक व प्राचार्य यांच्यासाठी सदर कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमास महाराष्ट्रातील ३७ कॉलेजमधून एकूण ७४ सदस्यानी सहभाग नोंदविला,डॉ. संजय शेडमाके, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या कर्यक्रममाचे अध्यक्षा डॉ प्रतिमा ताटके, प्राचार्य सी यु शहा फार्मसी कॉलेज, डीन सायन्स व टेक्नॉलॉजी हया होत्या, कार्यक्रमाचे उद्धघाटन डॉ आशिष पानट, संचालक, इंक्युबॅशन व इनोवेशन यानी केले, डॉ गणेश मगर असोसिएट डीन , डॉ सुलभा पोवार संगणक प्रोग्रामर व परीक्षा विभागाचे अधिकारी आणि सर्व कर्मचारीवृंद हया कार्यक्रमास उपस्थित होते.

एमकेसीएल चे श्री राजन यांनी विद्यार्थ्यांनीची प्रवेश प्रक्रिया ते परीक्षा संबंधित महीती सॉफ़्टवेअर आधारीत दिली. सलग्नता विभाग व शैक्षणिक विभाग यांचा देखील कार्यक्रमात सहभाग होता. श्री गिरीश राउत व श्रीमती प्रमिला वारीक हया उपस्थित होत्या.डॉ आशीष पानट , यानी नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० व परीक्षा पद्धती या बद्दल माहिती दिली.कर्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ प्रतिमा ताटके यांनी परीक्षा कार्य पद्धती बाबतचे मार्गदर्शन केले व परीक्षा विभागाने अशा प्रकारचे उद्बोधन कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल अभिनंदन केले. कार्यक्रमाची सांगता कार्यक्रमात दूरस्थ शिक्षण विभाग यांच्या संचालीका डॉ भोसले यांनी मर्गदर्शन केले व नवीन अभ्यास केंद्र सुरु करण्याचे आव्हान केले. दूरस्थ शिक्षण विभागाची सविस्तर माहिती सहायक कुलसचिव श्री शुभम सोनावणे यानी दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ श्रुती सावंत यांनी केले तसेच श्री राजेंद्र वाटेगावकर सहायक कुलसचिव यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमामुळे एमकेसीएल पोर्टल बाबत महत्वपूर्ण माहिती मिळाली अशी प्रतिक्रिया श्री मुक़ेकर संचालक यानी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्या कारीता सर्व कर्मचारी व श्री अजय भाटिया सहायक कुलसचिव यानी विशेष कार्य केले.

## Orientation Programme for Doctoral Scholars and Research Supervisors

An Orientation program for doctoral scholars and supervisors organized jointly by the PhD Cell and IQAC of SNDT Women's University was held on 17 October 2022 in Patkar Hall of SNDT WU with the purpose of orienting the newly inducted research scholars to the need, purpose, strategies and ethics of research and to familiarize them with the procedures of pursuing doctoral research.

The inaugural ceremony was graced by the Honorable Vice Chancellor Prof Ujwala Chakradeo, Pro Vice Chancellor Dr Ruby Ojha, IQAC Coordinator, Dr. Sujata Bhan, PhD Cell Incharge Dr. Manisha Madhava. It was attended by over 200 research scholars, guides, Heads and faculty members of the University and its affiliated colleges. In the inaugural presentation titled "Research: A Journey" Hon. Vice Chancellor Prof Chakradeo impressed upon the transformative nature of research on both individuals and society and implored scholars to be creative.







The other speakers for the program included, Prof. S. Chandrasekhar, from Indira Gandhi Institute of Development Research, Mumbai; Prof. Anuradha Majumdar, Dean, Science and Technology, University of Mumbai; Prof. Ashish Pandey, from Shailesh J. Mehta School of Management, IIT Bombay and Prof. D. Parthasarthy of the Department of Humanities and Social Science, IIT Bombay. The speakers spoke on topics including identifying a research agenda to inter and trans disciplinary research in the context of NEP, Indian Knowledge System and Feminists Perspectives in research. The Orientation program ended with Prof. Ruby Ojha and Dr. Madhava sharing the guidelines of research in SNDT Women's University.

## मिळाली जगण्याची दिशा

समाज कार्य म्हटलं की नजरेसमोर येतात ते म्हणजे निस्वार्थपणे समाजासाठी झटणारे समाजसेवक. समाज कार्य करण्यासाठी लागते ती तळमळ आणि समाजाच्या प्रति असलेलं ऋण फेडण्याची जिद्द. समाज कार्य विभागात प्रवेश घेतल्यानंतर असं प्रकर्षाने जाणवत गेलं की आपण मी म्हणून नाही तर आपण आम्ही म्हणून काम करणं गरजेचं आहे आणि त्याची पावती म्हणजे समोरच्याच्या चेहऱ्यावर येणारं हसू. हे हसू आपल्याला एक वेगळ्याच प्रकारचे समाधान आणि आनंद देऊन जाते आणि त्यामुळे अजून जोमात काम करायची इच्छा निर्माण होते. मला असं वाटतं की महिलांनी शिकण्यासाठी महर्षी कर्वे ह्यांच्या पुढाकाराने स्थापित केलेलं श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ आणि त्यांच्याकडून मिळालेली प्रेरणा ही आम्हां सर्वांना समाजकार्य करण्यासाठी एक दीपस्तंभ ठरले आहे. जसं मातीच्या गोळयाला आकार देण्याचं काम कुंभार करत असतो त्याच पद्धतीने आम्हां विद्यार्थिनींमधील गुण ओळखून आम्हांला वेळोवेळी कौतुकाची थाप आणि गरज भासल्यास खडे बोल ऐकवून आमच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याचं काम हे एस एन डी टी महिला विद्यापिठाच्या समाजकार्य विभागाचे संचालक, प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले आहे समाजकार्य विभागाने आम्हां सर्वांनाच एक वेगळी दिशा आणि सकारात्मक दृष्टिकोन देत जगण्याचा एक नवा अर्थ देऊन जीवन सर्वार्थाने संपन्न करायची एक वाट दाखवली आहे. ह्या वाटेवर वाटसरू सारखं चालत राहून आम्ही यशाची शिखरे पादाक्रांत करू आणि आमच्या ह्या व्यक्तिमत्त्वात समाजकार्य विभागाचा मोलाचा वाटा आहे. आम्हांला केलेले हे मार्गदर्शन आणि आमच्यावर ठेवलेला विश्वास आम्ही नक्की सार्थ करु. धन्यवाद!



दिव्या सरमळकर,
विद्यार्थी समाजकार्य विभाग,
एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई

## 9th Annual International conference on 'Holding Spaces Across Communities using Dance and other Arts Therapies'

Creative Movement Therapy Association of India with SNDT Women's University, Department of Special Education organized CMTAI's 9th Annual International conference with the theme 'Holding Spaces Across Communities using Dance and other Arts Therapies' on November 19, 2022.

The three-day event hosted 110 participants. The pre-conference intensive workshop was facilitated by DR Corrina Brown. The theme was 'Finding Flow: Emergent Kinesthetic Processes in Improvisational Movement and Dance Therapy'.



The international conference was inaugurated by Prof. Ujwala Chakradeo, Hon. Vice Chancellor, SNDTWU as the chief guest and patron. The keynote was given by Mrs Kanchan Sontake, Founder, Natyashala, and Dr Corrina Brown, PhD, LCAT, BC-DMT.



Post inauguration first day's events began with a common opening ritual based on movement which set the tone of energy and enthusiasm for the days to come. The various sessions were divided between four rooms. There were 24 facilitators who conducted experiential sessions of 50 minutes each, across varied movement-based interventions like Expressive Arts Based Therapy, Eurythmy, Arts Based Therapy, Dance Movement Therapy and Ecological Grief, Drama therapy, Neuro-Dramatic Play, Therapeutic Arts, Music Therapy etc.

There are also poster and research paper presentations by various practitioners from the field of Creative Movement Community which were keenly participated and appreciated by the audience.

Day 1 ended on an intense high note with a drum circle. Participants and the organisers let their hair down and let loose their unique moves. The drumming team took everyone through a journey of beats varying from the elemental Ganesh Vandana to folk rhythms from Gujrat, Rajasthan etc. The participants also got an opportunity to participate in the drumming courtesy the additional Djembes made available by the organisers.

Day 2 saw the continuation of the sessions, concluding with a panel discussion on the topic: Addressing Psychosocial Needs within Communities through the Arts Therapies. The panellists from various fields within the Creative Movement Community shared their expertise and knowledge with the audience. The discussion was moderated by Akshata Parekh, Expressive Arts Therapist.

The entire conference brought in a new energy and enthusiasm to the climes of SNDTWU making the three days high energy and joyful. We look forward to recreating the mood and energy once again in the future.

## एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ शिक्षकेत्तर कर्मचारी संघ (शासन मान्यता प्राप्त) रौप्य महोत्सवी वर्षा निमित्त वैद्यकीय तपासणी शिबिर

" श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ शिक्षकेत्तर कर्मचारी संघ" सन २०२२ मध्ये २५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. संघटनेच्या "रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य राखून पूर्वनियोजित उपक्रमाअंतर्गत, वोक्हार्ट हॉस्पिटल आणि सरकारी दंत महाविद्यालय आणि रुग्णालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या, शुक्रवार, दिनांक १६ डिसेंबर, २०२२ रोजी चर्चगेट आणि मंगळवार दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी जुहू आवरामध्ये स्थायी व अस्थायी अधिकारी / कर्मचारी, निवृत कर्मचारी यांच्यासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिराअंतर्गत BMI, BMD, BP, RDS, ECG, Lipid Profile, दंत चिकित्सा, डोळे तपासणी इ. तपासणीचा समावेश होता.

आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन चर्चगेट आवारात विद्यापीठाच्या मा. कुलगुरू, डॉ. उज्वला चक्रदेव यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री जगदीश मोरे, सहाय्यक आयुक्त (जनसंपर्क), राज्य निवडणूक आयोग आणि मा. डॉ. अमेय प्रदीप देसाई, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी, ज्युपिटर रुग्णालय, ठाणे उपस्थित होते. तसेच विद्यापीठाच्या जुहू आवारात आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलसचिव मा. डॉ. विलास नांदवडेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मा. प्रो. डॉ. सुदेश मुख्योपाध्याय, माजी अध्यक्ष, भारत सरकार, पुनर्वसन परिषद, संघटलनेचे अध्यक्ष श्री. प्रभाकर पिळणकर, महासचिव, श्री. यशवंत गावडे व अन्य कर्मचारी उपस्थित होते. आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ एकूण २५४ अधिकारी आणि कर्मचार्यांनी घेतला होता.







## पी.व्ही.डी.टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वुमेन च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत रक्तदान शिबिराचे आयोजन

एसएनडीटी महिला विद्यापिठाच्या पी.व्ही.डी.टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वूमेन एन एस एस विभागामार्फत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते सदर रक्तदान शिबिर हे रिलायन्स फाउंडेशनच्या माध्यमातून आयोजित करण्यात आले होते. शिबीराचे उद्घाटन एन. एस.एस. राज्य संपर्क अधिकारी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे डॉ.प्रशांतकुमार वनंजे यांच्या हस्ते करण्यात आले.




सदर शिबिरामध्ये पीव्हीडीटी कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या भावी शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात रक्तदात्यांना प्रोत्साहित करून त्यांना रक्तदान करणे काळाची गरज कशी आहे तसेच रक्तदान केल्याने इतरांना तसेच स्वतःला कोणते फायदे होतात याबाबत योग्य ते विवेचन केले याचाच परिणाम म्हणून पूर्ण दिवसभरात 4 8 रक्तदात्यांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबिरामध्ये पीव्हीडीटी महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी देखील उत्स्फूर्तपणे एक सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान शिबिरात आपला सहभाग नोंदवला.



तसेच विद्यापीठ स्तरावरील विविध पदाधिकारी व अधिकाऱ्यांनीही रक्तदान केले यात प्रामुख्याने सहाय्यक कुलसचिव डॉ.बाळू राठोड, प्राध्यापक डॉ. विलास जाधव, डॉ भूपेन बनसोड,डॉ.काळे प्रवीण, डॉ.अमोल उबाळे,विशाल जाधव, अक्षय वाघेला,वृषाली कुळकर आदींनी रक्तदान मध्ये आपला सहभाग नोंदवला. महाविद्यालयाच्या 40 स्वयंसेवकांनी रक्तदान यशस्वी होण्यासाठी आपला हातभार लावला.सदर रक्तदान प्राचार्य डॉ. सुभाष वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजीत करण्यात आले होते. एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ.अमोल उबाळे व प्रा.प्रतिभा उरसल यांनी रक्तदान यशस्वी होण्यासाठी उत्तम नियोजन केले.सदर कार्याबद्दल रिलायन्स फाउंडेशन तर्फे महाविद्यालयाला प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.